# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


MERC/ADM/RTI/093/2019/**1004** Dt. 04.11.2019

प्रति,
श्री. राजेश सुरेंद्र चंपानेकर,
१०९, पाँश एंटरप्राइझ,
भोला भगवान इंडस्ट्रीयल इस्टेट,
आय.बी. पटेल रोड, गोरेगांव (पूर्व),
मुंबई - ४०००६३.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. निरंक रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.१४.१०.२०१९ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | विद्युत लोकपाल मुंबई केंव्हा पासून रिक्त आहे. | विद्युत लोकपाल मुंबई हे पद दि. ७.०४.२०१९ पासून रिक्त आहे. |
| २ | मुंबईचे पद महत्वाचे असताना अतिरिक्त कार्यभार देण्याचे प्रयोजन काय? | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रकरण १ मधील २ (फ) नुसार माहिती या व्याख्येतील गुणीत उत्तरामध्ये 'का' या प्रश्नांची उत्तरे समाविष्ट नाही. 'का' प्रश्न म्हणजे एखाद्या विशिष्ट गोष्टीचे समर्थन करण्याची कारणे विचारण्यासारखे आहे. अमूक एखादी विशिष्ट गोष्ट का करण्यात आली किंवा का केली नाही, याचे समर्थन देण्याच्या अर्थाने, त्याची कारणे नागरिकांना कळविणे शासकीय माहिती अधिकाऱ्यासाठी अपेक्षित नाही कारण नागरिक, केवळ माहिती मिळण्याची मागणी करू शकतो. असे समर्थन करणे ही बाब अभिनिर्णित करणाऱ्या प्राधिकरणांच्या अखत्यारीत येते आणि तिचे माहिती म्हणून योग्य प्रकारे वर्गीकरण करता येऊ शकत नाही. ***(डॉ. सेल्सा पिंटो वि. गोवा राज्य माहिती आयोग व इतर २००८(४) ऑल महाराष्ट्र लॉ रिपोर्टर ९८६) चा आदेश.*** |
| ३ | विद्युत लोकपाल (मुंबई) पद नियमितपणे केंव्हा भरण्यात येत आहे? | |
| ४ | आयोगाच्या सदर त्रुटी बाबत कोणत्या वरिष्ठ प्राधिकारीकडे दाद मागता येते त्याचा तपशील. | |


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| | | तसेच "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. |

माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19(1) अन्वये श्री. अनिलकुमार उके, संचालक (विधी) अतिरिक्त कार्यभार /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर 1, 13 वा मजला, कफ परेड, मुंबई - 400005. टेलिफोन नं. 022-22163964/65/69 **Email:** anilkumar.ukey@merc.gov.in

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी